महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# Original Minutes

# Dated 23rd August 2016

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद.

## दिनांक २३/८/२०१६ रोजी ११.०० वाजता महसूल प्रशासन प्रबोधीनी, जालना रोड, औरंगाबाद येथे मा. सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांची सभेचा इतिवृत्त

दि. २३/८/२०१६ रोजी ११.०० वाजता महसूल प्रशासन प्रबोधीनी, जालना रोड, औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बैठक मा. जनाब एम.एम.शेख साहेब, चेअरमन, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले त्यात खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते. सदरच्या सभेत खालील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आले.

| | |
|---|---|
| १) मा. जनाब एम.एम.शेख साहेब, | अध्यक्ष |
| २) मा. जनाब हबीब फकीह साहेब, | सदस्य |
| ३) मा. जनाब अब्दुल्लाह खान दुर्राणी ऊर्फ बाबाजानी साहेब, | सदस्य |
| ४) मा. जनाब मौलाना जहिर अब्बास रजवी साहेब, | सदस्य |
| ५) मा. जनाबा ऐनूल अत्तार साहेबा, | सदस्य |
| ६) मा. जनाबा नसीमा बानो नजीर पटेल, मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ | सदस्य सचिव तथा |

विषय क्र. १ : मा. सदस्यांच्या रजे बाबत

ठराव क्र. १/२०१६: मा. सदस्य जनाब हुसैन दलवाई साहेब व मा. मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेब यांनी अनुउपस्थिती बाबत कळविले असून त्यांची रजा सर्वानुमते मान्य करण्यांत आली.

विषय क्र. २ : दि. २६/२/२०१४ व दि. २९/१०/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. २/२०१६: वरील दोन्ही सभेंचे इतिवृत्त मा. सर्व सदस्यांना वाचून दाखविण्यात आले यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती दोन्ही सभेंचे इतिवृत्तास मान्यते बाबत पुढील सभेत निर्णय घेता येईल करिता खालील प्रमाणे सुचना निर्गमित करणेत आला.

१) मराठी मध्ये ऐजंडा तयार करुन सर्व सदस्यांना देण्यात यावे
२) केंद्र व राज्य सरकार कडून आलेले पत्र व्यवहार सर्व सदस्यांना पत्राद्वारे कळवावे.
३) सदरचे दि. व दि. २९/१०/२०१४ चे मुद्दा क्रं. B,D ९ बाबत लेखी खुलासा करावा

**विषय क्र. ३** : मुख्यालयातील अभिलेख कक्षात असलेले सर्व अभिलेखचे संगणकीकरण करणे व त्याची जोपासणा करणे बाबत निर्णय घेणे

**ठराव क्र. ३/२०१६:-** सभेस माहिती देण्यात आली की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,

मुख्यालयात असलेले अभिलेख कक्षा मधील महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे धर्मदाय आयुक्तांकडून प्राप्त झालेले मुळ संचिका, वक्फ मंडळाचे विविध विभागातील मुळ संचिका तसेच विविध न्यायालयातील संचिकांचे जोपासणा करण्यासाठी त्याचे संगणकीकरण करुन स्कॅनिंग व डीजीटायझेशन करणे आवश्यक आहे, त्यासाठी कॉम्पॅक्टर खरेदी करणे आवश्यक आहे.

सभेस अधिक माहिती देण्यात आली की, वरील आवश्यक असलेले कामासाठी The Training Cum Production Center for Ex-serviceman, Karanje Naka, Satara-1 यांना पत्र देऊन कोटेशन मागविण्यांत आले होते त्यांनी रक्कम रुपये २१,६२,११५/- (अक्षरी रुपये एकवीस लाख बासट हजार एकशे पंधरा फक्त) अधिक १२.५% वॅट असे कोटोशन सादर केलेले आहे. सदरचे कॉम्पॅक्टर विविध जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद, जालना, नांदेड यांनी खरेदी करुन त्यावर त्यांचे काम सुरु आहे. या शिवाय competent authority godrej करारानुसार compactor खरीदी करता येईल. या बाबत निर्णय घेण्यात यावा.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालयातील अभिलेख कक्षाची सर्व मुळ संचिका व वक्फ मंडळाचे सर्व कागदपत्रांचे जोपासण्यासाठी कॉम्पॅक्टर व स्कॅनिंग व डिजिटाईझेशन करणे संबंधी मान्यता देण्यात येत आहे व मु. का. अ. यांनी खरेदी करिता शासना कडुन प्राप्त निधी रुपये ३. कोटी शिल्लक असुन शासनाची निदर्शनास आणून देवुन निधी खर्च घालावा जर शासना कडुन निर्देश प्राप्त न झाल्यास वक्फ मंडळाच्या निधीतून खर्च घालने बाबत वक्फ मंडळाने निर्णय घ्यावा.

विषय क्र. ४ (१) : कंत्राटी पध्दतीनुसार कर्मचा-यांची भरती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव क्र. ४/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, नॅशनल वक्फ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. अल्पसंख्यांक विकास मंत्रालय, (भारत सरकार) न्यू दिल्ली यांनी खालील तपशिला नुसार (८) पदे कर्मचा-यांच्या कंत्राटी पध्दतीवर भरती करण्यासाठी रक्कम रुपये ३९,९१,०००/- (अक्षरी रुपये एकोनचाळीस लाख एक्यानव हजार फक्त) वक्फ मंडळास अनुदान दिलेले आहे.

| अ क्र | पदांची वर्गवारी | पदांची संख्या | कंत्राटी मानधन |
|---|---|---|---|
| १ | लेखाधिकारी | २ | दर माह रुपये २७,०००/- |
| २ | विधी सहाय्यक | २ | दर माह रुपये २७,०००/- |
| ३ | विभागीय अधिकारी / सर्व्हेक्षण सहाय्यक | २ | दर माह रुपये २७,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | वक्फ अधिकारी | २ | दर माह रुपये २०,०००/- |
| ५ | लेखा विभागाचे संगणकीकरण | -- | एकाच वेळी रुपये १,००,०००/- |
| ६ | प्रशिक्षण खर्च | -- | एकाच वेळी रुपये ७५,०००/- |
| ७ | स्टेशनरी व इतर खर्च | -- | एकाच वेळी रुपये २५,०००/- |
| ८ | GIS मॅपींग व अतिक्रमण निष्कासित करणे | -- | एकाच वेळी रुपये ८,७५,०००/- |

नॅशनल वक्फ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. अल्पसंख्यांक विकास मंत्रालय, (भारत सरकार) न्यू दिल्ली यांनी वरील कामासाठी खालील तपशिला नुसार वक्फ मंडळाच्या खात्यावर रक्कम जमा केलेली आहे.

| अ.क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १ | ०५.३.२०१५ | १६,८१,०००.०० |
| २ | ०३.०३२०१५ | ८२,०००.०० |
| ३ | १८.१२.२०१५ | १४,३४,०००.०० |
| ४ | ३१.०३.२०१६ | ३९,९१,०००.०० |

वरील बाबींवर सविस्तर चर्चा करण्यांत आली वरील (८) पदे भरण्यांत आली. नॅशनल वक्फ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. अल्पसंख्यांक विकास मंत्रालय, (भारत सरकार) न्यू दिल्ली यांनी सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थीक वर्षात रक्कम दिलेली असून यावर अद्याप पर्यंत निर्णय घेण्यात आलेला नाही. यावर निर्णय घेण्यांत यावा असे सभे समोर मांडण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती वरील पदे भरण्यासाठी जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात यावे व त्याचा सविस्तर तपशील पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

विषय क्र. ४ (२) : महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास वार्षीक अनुदान मिळणेसाठी पाठपुरावा करणे बाबत.

**ठराव क्र. ५/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, स्वतंत्र मंडळ असून महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास, मंत्रालय, मुंबई च्या अधिपत्त्याखाली काम करीत आहे. मागील ३० वर्षापासून महाराष्ट्र शासनाकडून भारतातील इतर राज्या प्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास वार्षीक अनुदान मिळावा म्हणुन सातत्यानी प्रयत्न केलेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या कॅबीनेटची बैठक दि. २५/११/२०११ मध्ये १५.०० कोटी अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु आज पर्यंत त्यावर अमलबजावणी झालेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे ३०,००० मुस्लीम वक्फ न्यास असून १७५ वक्फ संस्था हे सरळ वक्फ मंडळाच्या देखरेख खाली आहे. इतक्या मोठया प्रमाणावर वक्फ संस्था व त्याच्या संबंधित वक्फ मिळकती असुन त्यांचे कामकाज पाहण्यासाठी फक्त ४६ कर्मचारी कार्यरत आहे जे अत्यअल्प आहे यामुळे वक्फ मिळकतीचे संरक्षण व वक्फ संस्थांचे विविध कामासाठी अनेक अडचणी येत आहे. महाराष्ट्र शासनानी वक्फ मंडळास १०६ कर्मचारी त्या मध्ये जुने ४६ व नवीन ६० अशी अस्थापना नियुक्तीस संमती दिलेली आहे. परंतु वक्फ मंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे सदरची भरती प्रक्रिया पुर्ण करण्यांत आलेली नाही. महाराष्ट्र शासनाकडून वक्फ मंडळास अस्थापनेसाठी व प्रशासकीय खर्चासाठी अनुदान प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

सभे समोर अशी माहिती देण्यात आली की, वक्फ मंडळात सध्या कार्यरत असलेले ४६ कर्मचा-यांसाठी वक्फ मंडळाकडून वक्फ फंड वसूली व फी द्वारे स्व:निधीतून रक्कम रुपये १,७३,८३,७९५/- खर्च करण्यांत येत आहे. प्रस्तावीत अस्थापनानुसार नवीन ६० कर्मचा-यांची भरतीसाठी अधिक भार रक्कम रुपये १,७४,१७,६४०/- एवढा निधी चा बोजा पडणार आहे म्हणजे अस्थापनेवर एकुण रक्कम रुपये ३,४८,०१,४३५/- ऐवढा वार्षीक निधी लागणार आहे. इतक्या मोठया प्रमाणावर रक्कम वक्फ मंडळाकडे उपलब्ध होणे अशक्य असून या साठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त करणे क्रम प्राप्त आहे.

~~याबर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती अस्थापना व प्रशासकीय~~ खर्चासाठी महाराष्ट्र शासनाकडून, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास वार्षीक अनुदान मिळणेसाठी पाठपुरावा करावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४ (३): महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना वेतनाचे एकसारखेपणा करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे संबंधी.

सभेस माहिती देण्यात आली की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास सध्या कार्यरत असलेले ४६ कर्मचारी असून त्यापैकी २४ कर्मचारी हे संवर्ग-३ व २२ कर्मचारी संवर्ग-४ मध्ये कार्यरत आहे. खालील ५ कर्मचा-यांना त्यांच्या ज्येष्ठता यादी नुसार पदोन्नती झाली नसल्याने सदरहू पदोन्नती मुळे समानता न झाल्यामुळे ईतर कर्मचा-यांना सदर बाबीचा लाभ मिळु शकला नाही म्हणून सर्वांना एकसारखे वेतन वाढ व पदोन्नती देणे बाबत.

१. बेग इफ्तेखारुल्लाह, स्टेनोग्राफर
२. काजी मिस्बाहोद्दिन, सिनिअर ऑडिटर
३. शफिक अहेमद, वक्फ अधिकारी
४. हाफेज सय्यद अखीलोद्दिन, वक्फ अधिकारी
५. एम.ए.माजेद खान, चौकशी अधिकारी

**ठराव क्र. ६ /२०१६:** यावर सविस्तर चर्चा होउन सर्व कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ प्रमाणे वेतन अदा करणे अनिवार्य आहे. या बाबत संमती देणेत आली तसेच उपरोक्त कर्मचा-यांना वेगवेगळे प्रकारचे वेतन आज रोजी अदा होत आहे त्या मध्ये एक समानता आण्णे संबंधी उपाययोजना सविस्तर अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४ (४) : तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सय्यद एजाज. हुसैन यांनी घेतलेल्या नवीन कर्मचा-यांची भरती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे

**ठराव क्र. ७/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, श्री. सय्यद एजाज हूसैन, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ११ व ६ महिण्याचे कंत्राटी पध्दतीवर (११) कर्मचा-यांची कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केली होती कंत्राटी मुदतीनंतर सर्व संबंधित कर्मचा-यांना कमी करण्यांत आले.

या वर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील प्रमाणे कंत्राटी पध्दतीवर भरती केलेल्या कर्मचा-यांना या पुर्वी कमी करणेत आले सदरची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वृत्तीला सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

विषय क्र. ४ (५) : विभागीय व जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालयांचा कामांचा आढावा बाबत

**ठराव क्र. ८/२०१६:** महाराष्ट्र राज्यात वक्फ मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर, अमरावती या ठिकाणी सुरु करण्यांत आलेले आहे तसेच मराठवाडा विभागात हिंगोली वगळता सर्व जिल्ह्यात वक्फ मंडळाचे कार्यालय आहेत. वरील विभागात एक किंवा दोन कर्मचारी कार्यरत आहे त्यांचे कामाचा आढावा घेणे या सर्वानुमते सदरचा मुद्दा पुढील बैठकीत चर्चेस घेणेचे ठरले.

विषय क्र. ४ (६) : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वार्षीक आर्थीक संकल्पास मान्यत देणे बाबत.

**ठराव क्र. ९/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे वक्फ फंडाच्या आर्थीक संकल्प वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७८ अन्वये मान्यता देऊन त्यास महाराष्ट्र शासनाची अल्पसंख्यांक विकास विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सन २०१६-१७ चे अर्थसंकल्प खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण उत्पन्न सन २०१६-१७ | रुपये ५,४७,४९,६१४/- |
| एकुण अंदाजीत खर्च सन २०१६-१७ | रुपये ६,९७,९५,१४७/- |
| तुट सन २०१६-१७ | रुपये १,५०,४५,५०६/- |

वरील एकुण उत्पन्नातून रक्कम रुपये १,५०,४५,५०६/- तुट असून सदरची रक्कम मा. धर्मदाय आयुकत, यांच्याकडे वक्फ मंडळाची २% प्रमाणे वसूल केलेली रक्कम प्राप्त झाल्यानंतर किंवा महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर भरुन काढण्यात येईल. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून महाराष्ट्र शासनाकडे वार्षीक अनुदान प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा सुरु असुन अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. सदरचे अनुदान प्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना भरती प्रक्रिया सुरु करण्यांत येईल. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांनी मान्यता दिल्यास वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७८ नुसार सदरचे अर्थसंकल्प सन २०१६-१७ मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यांत येईल.

यावर चर्चा होऊन चर्चेअंती बजेट साठी बैठकी मध्ये अर्धे सत्र ठेवण्यात यावे व बजेट चे अंदाज पत्रक बैठकीच्या आठ दिवसा पुर्वी सर्व सदस्यांना देण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४ (७) : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली असलेल्या वक्फ संस्थांच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पास मान्यत देणे बाबत.

**ठराव क्र. १०/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे वक्फ फंडाच्या आर्थीक संकल्प वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४५ अन्वये मान्यता देऊन त्यास महाराष्ट्र शासनाची अल्पसंख्यांक विकास विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सन २०१६-१७ चे अर्थसंकल्प खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण उत्पंन्न सन २०१६-१७ | रुपये १,८६,०५,०४४/- |
| एकुण अंदाजीत खर्च सन २०१६-१७ | रुपये १,८२,५९,९२४/- |
| उरणारी शिल्लक सन २०१६-१७ | रुपये ३,४५,१२०/- |

सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पानुसार एकुण उत्पन्न रक्कम रुपये १,८६,०५,०४४/- व खर्च रक्कम रुपये १,८२,५९,९२४/- तसेच उरणारी शिल्लक रक्कम रुपये ३,४५,१२०/- असुन सन २०१६-१७ या वार्षीक अर्थसंकल्पीय वर्षात रक्कम रुपये ७०.०० लाख प्राप्त झाले असुन वक्फ अधिनियम १९९५ मध्ये दुरुस्ती नंतर रक्कम २.५% बाजार मुल्यांकनानुसार मागील वर्षा पेक्षा जास्त भाडे व लिज ची रक्कम रुपये २७,३६,०००/- अधिक प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांनी मान्यता दिल्यास वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४५ नुसार सदरचे अर्थसंकल्प सन २०१६-१७ मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यांत येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती बजेट साठी बैठकी मध्ये अर्धे सत्र ठेवण्यात यावे व बजेट चे अंदाज पत्रक बैठकीच्या आठ दिवसा पुर्वी सर्व सदस्यांना देण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ५ (१) : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली असलेल्या पनचक्कीच्या नुतनीकरण बाबत

**ठराव क्र. ११/२०१६:** पानचक्की च्या नुतनीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी श्रीमती माया वैद्य, आर्किटेक्ट औरंगाबाद यांनी प्रोजेक्ट तयार केलेला असून त्यांनी मा. सर्व सदस्यांना सभे समोर प्रोजेक्टर वर सविस्तर माहिती दिली.

या वर श्रीमता माया वैद्य यांनी सादरीकरण (Presentation) देवुन पनचक्की सौदर्यकरण व जिर्णोध्दार (Restoration ) करणे बाबत सादरीकरण केले व सदरचे सौदर्यकरणास येणा-या खर्चाचा अंदाज पत्रक सादर करणे ची विनंती श्रीमती माया वैद्य यांना करण्यात आली. श्रीमती माया वैद्य यांना अंदाज पत्रक दिल्यानंतर या कामाचा खर्च डि.पी.डी.सी. मधुन प्राप्त करुन घेण्यासाठी पुढील पाठपुरावा करावा हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ५ (२) : औरंगाबाद येथील सर्वे नं. ११८ महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालयाच्या बांधकामा बाबत

**ठराव क्र. १२/२०१६:** सर्वे नं. ११८ हिमायत बाग, नगर भुमापन क्र. ११४८४, क्षेत्र ०३ एकर २२ गुंठे पैकी आवश्यक क्षेत्रा मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्यालय, कार्यालय व महाराष्ट्र राज्य न्यायाधिकरण, च्या इमरतीचे बांधकामासाठी महाराष्ट्र शासनानी मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय मुंबई चे अ.शा. पत्र क्र.MDD-२९३/CR.५१/१३/Desk-४ दि. निरंक अन्वये ३.८ लाख मंजुर केल्याचे कळविले असून पैकी शासन निर्णय क्र. वक्फ.२०१५/प्र.क्र.१९४/का-४ दि. १०/८/२०१५ अन्वये संरक्षण भिंती, प्रवेश द्वार, व सुरक्षा रक्षकासाठी कॅबीनच्या बांधकामासाठी रक्कम रुपये १,१०,८२,३४३/- किंमतीच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदरच्या कामास सुरुवात कार्यकारी अभियंता (जागतीक बँक ) प्रकल्प विभाग औरंगाबाद यांच्या मार्फत करण्यांत येत आहे. अशी माहिती सभे समोर देण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन सदरची निधी शासनाकडुन प्राप्त अनुदाने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालय बांधकाम इमारत सर्वे नं. ११८ येथील सि.टी. एस नं. १४४८४ येथे प्रस्तावित आहे सदरच्या इमारतीचे बांधकाम होणार आहे म्हणून सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. व या बाबत ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

विषय क्र. ५ (३) : पैठण येथील सामाजिक हॉल (शादीखाना) च्या बांधकामास मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. १३/२०१६:** मौ. ता. पैठण येथील वक्फ मालमत्ता नगर भुमापन क्र. ४२९७ नेहरु

चौक, पैठण येथे जुनी इमारत मोडकळीस आल्यामुळे पडलेली आहे. सदरची इमारत मागील १० ते १५ वर्षापासुन जिर्ण व निकामी असल्यामुळे वापरात नव्हती म्हणुन या कार्यालयाकडून २०१५ मध्ये सदरची इमारत पाडण्यात आलेली आहे. सदरच्या जागेत सामाजिक हॉल (शादीखाना) चे बांधकाम व्हावे अशी स्थानिक लोकांची मागणी आहे त्याकरीता आमदार फंडातून निधी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणार आहे. म्हणुन त्या जागेवर सामाजिक हॉल (शादीखाना) चे बांधकामासाठी आवश्यक आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे त्यास मान्यता मिळावी म्हणुन स्थानिक लोकांकडून विनंती करण्यांत आलेली आहे.

यावर सर्व सदस्या चर्चा होउन पैठण येथील सि.टी.एस नं. ४२९७ चा वक्फ मिळकतीवर शादीखाना बांधण्यासाठी मा. आमदार यांचे निधी मिळणार आहे करिता ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबत प्रस्ताव मांडण्यात आला सदर ना हरकत प्रमाणपत्र साठी प्रस्ताव मागवुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावे तद्दनंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल असे ठरविण्यात आले.

विषय क्र. ६ (१): सर्वे नं. ११८ हिमायत बाग, औरंगाबाद मध्ये सामाजिक हॉल (शादीखाना) च्या इमारतीचे बांधकामास मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. १४/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, वक्फ मंडळाच्या थेट निगराणी खाली असलेल्या सर्वे नं. ११८ एन-१३ सिडको, सादात मस्जीद जवळ, हिमायत बाग, औरंगाबाद या भुखंडावर महाराष्ट्र शासनांनी शादीखाना बांधण्यासाठी प्रस्तावास त्यांचे पत्र दि. २२/४/२०१६ अन्वये तत्वतः मान्यत दिली आहे. शासन निर्णय नगर विकास विभाग, क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.६८/नवि-१६ दि. १५/२/२०१५ अन्वये अल्पसंख्यांक विकास कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीतून सदर ठिकाणी शादीखाना बांधण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद यांनी वक्फ मंडळाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केल्या प्रमाणे कार्यकारी अभियंता जलनिःसारण प्रकल्प महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दि. ८/८/२०१६ अन्वये एकुण जागे पैकी एक एकर जागेचे नाहरकत प्रमाणपत्र ची मागणी केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती सर्वे नं. ११८ एन-१३ सिडको, सादात मस्जीद जवळ, हिमायत बाग, औरंगाबाद या भुखंडावर महाराष्ट्र शासनांनी शादीखाना बांधण्याचे प्रस्तावास नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ६ (२) : जामा मस्जीद मौजे नळदुर्ग ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद ची सेवा इनाम

जमीन सर्वे नं. २२८ पैकी क्षेत्र ०.४१ आर जमीन पेट्रोलपंप चालविण्यासाठी ३० वर्षाचे कराराने भाडेतत्वावर देणे बाबत

**ठराव क्र. १५/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, या कार्यालयाचे आदेश क्र. मरावम /एसएनटी/ ३४४१/२०१४ दि. १६/६/२०१४ अन्वये जामा मस्जीद नळदुर्ग ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद ची सेवा इनाम जमीन सर्वे नं. २२८ पैकी क्षेत्र ०.४१ आर मासिक भाडे रक्कम १०,५००/- रुपये प्रमाणे ११ महिण्यासाठी श्री. सय्यद जुबेर पाशा सज्जाद अली जहागीरदार यांना भाडेवर देण्यात आली होती सदरील भाडेकराराची मुदत माहे एप्रिल २०१५ मध्ये संपलेली आहे त्यापुर्वी अर्जदार यांनी दि. १६/६/२०१४ रोजी जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानबाद यांचे पत्र क्र. १३५/२०१५ दि. १७/३/२०१५ अन्वये भाडेकरार ३० वर्षासाठी करण्याची विनंती केली आहे.

सदरच्या प्रस्तावास मंजुरीसाठी वक्फ मंडळाची बैठकीत ठेवणे बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मा. सदस्यांनी त्यांचे पत्राद्वारे सुचना केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती प्रस्तावित प्रकरणांत ३० वर्षाचा भाडेकरार करण्यासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता लिज रुल्स-२०१४ (दुरुस्ती २०१५) नुसार पुढील कार्यवाही करुन करार करण्याची परवानगी सर्वानुमते देण्यात आली. सदरचा भाडेकरार देण्यास सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ६ (३) : जामा मस्जीद, औरंगाबाद च्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकतीच्या आमखास मैदानाच्या भाडे शुल्क आकारणी बाबत निर्णय घेणे

**ठराव क्र. १६/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, औरंगाबाद येथील ऐतिहासीक जामा मस्जीद च्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकतीच्या प्रकरणांत केस क्र. ४०/१७६/२०१२ मध्ये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४० नुसार दि. २०/६/२०१३ रोजी वक्फ मंडळाने आमखास मैदान वक्फ मालमत्ता असल्याचे घोषीत केले आहे तेव्हा पासून सदरचे मैदान वक्फ मंडळाकडे थेट ताब्यात असून त्याच्या वापरासाठी विविध संघटना कडून परवानगी मागविण्यात येत आहे. प्रति दिवस १०००/- प्रमाणे शुल्क जमा करुन वक्फ मंडळाकडून आमखास मैदान वापरने बाबत नाहरकत देण्यात येत आहे. सदरची जागा सार्वजनिक उपक्रमासाठी उपयोगी असून उदा. राजकिय सभा, विविध खेळ, संघटनाकडून आयोजीत कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रमासाठी तसेच लग्न कार्यक्रमासाठी, धार्मीक स्पर्धा,

मुस्लीम धार्मीक कार्यक्रम, शैक्षणिक परिषद, पार्किंग इत्यादी साठी दिवसंदिवस या मैदानाची मागणी येत आहे. सदरचे मैदानच्या वापरासाठी वेगवेगळे उपक्रमासाठी भाडे शुल्क आकारणे बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे असे सभे समोर मांडण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती आमखास मैदान वापरासाठी देण्या बाबत नाहरकत प्रमाणपत्रचे प्रती दिवस खालील तपशिला प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १) खेळासाठी | प्रती दिवस | रुपये २०००/- |
| २) धार्मीक कार्यक्रमासाठी | प्रती दिवस | रुपये २०००/- |
| ३) शैक्षणिक कार्यक्रमासाठी | प्रती दिवस | रुपये २०००/- |
| ४) राजकिय कार्यक्रमासाठी | प्रती दिवस | रुपये ११,०००/- |
| ५) सार्वजनिक उपक्रमासाठी | प्रती दिवस | रुपये ११,०००/- |
| ६) व्यवसायिक कामासाठी | प्रती दिवस | (प्रचलित नियमानुसार हर्रासीने करण्यांत यावे) |

वरील प्रमाणे शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय : ६ (४) : वक्फ मिळकत सर्वे नं. ७७ क्रांती चौक, औरंगाबाद वक्फ मंडळाच्या ताब्यात घेणे बाबत.

**ठराव क्र. १७/२०१६**: सभेस माहिती देण्यात आली की, कब्रस्तान व मस्जीद, काला चबुत्रा, सर्वे नं. ७७, औरंगाबाद या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३/५/१९७३ पार्ट-अ च्या अनुक्रमांक १८८ वर असुन क्षेत्र ७ एकर २२ गुंठे ची नोंद आहे. सदरील वक्फ मिळकत पैकी काही क्षेत्र बेकायदेशिर रित्या श्री. भोपा सिंग यांच्या ताब्यात असल्याची नोंद शासन राजपत्रात आहे. सदरील वक्फ मिळकत परत वक्फ मंडळाचे ताब्यात घेण्यासाठी रेग्युलर सिव्हील अपील क्र. २०९/२००१ मा. जिल्हा न्यायालय, औरंगाबाद येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातर्फे करण्यांत आली होती त्या प्रकरणां मध्ये मा. न्यायाधिश श्री. एस.एस. गोसावी, यांनी दि. २४/२/२०१४ रोजी औरंगाबाद येथील सर्वे नं. ७७ वक्फ मिळकत असल्याचे आदेश दिले आहे.

तसेच सदर प्रकरणां मध्ये श्रीमती हरजिंदर कौर अवतारसिंग व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे सेकंड अपील क्र. ६३०/२०१५ with CA/७३१/२०१६ in SA/६३०/२०१५ दाखल केले होते परंतु त्यांचे सेकंड अपील मा. उच्च न्यायालयाने फेटाळलेले आहे श्रीमती

हरजिंदर कौर अवतारसिंग व इतर यांचे वकीलांनी वरील प्रकरणांत Status Quo आदेश Continue ठेवण्याची विनंती केली होती परंतु या परिस्थतीत त्याची काही गरज नसल्याने त्यांची विनंती नामंजुर करुन CA/७३१/२०१६ निकाली काढण्यात आले आहे.

मा. न्यायालयाचे आदेशानुसार वरील कब्रस्तान व मस्जीद च्या संबंधित सर्वे नं. ७७ ची मिळकत वक्फ मंडळाचे ताब्यात घेण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी, मा. पोलीस आयुक्त, यांना विनंती अर्ज करण्यांत आले आहे तसेच सर्वे नं. ७७ च्या संबंधित सर्व पी. आर. कार्ड मध्ये वक्फ संस्थेची नोंद घेणे करीता जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख व नगर भुमापन अधिकारी यांना सुचना देण्यात आली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती सदर मिळकतीचा तातडीने ताबा घेण्या बाबत कार्यवाही करावी तसेच जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालय सर्वे नं. ७७ मध्ये स्थलांतरीत करावे असे सर्वानुमते ठरले. व पी. आर कार्ड वरील नावनोंदणी करिता भुमिअभिलेख विभागाशी पत्रव्यव्हार कारावा.

विषय क्र. ६ (५) : बिबीका मकबरा औरंगाबाद या ऐतिहासिक स्थळामधील दोन मस्जीद मध्ये नमाज पठण ची परवानगी बाबत.

**ठराव क्र. १८/२०१६**: सभेस माहिती देण्यात आली की, जनाब जी.एस.ए.अन्सारी, माजी चेअरमन महाराष्ट्र हज कमीटी रा. आर. टी. ओ. ऑफिस, रेल्वेस्टेशन औरंगाबाद यांनी दि. १२/८/२०१६ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, औरंगाबाद येथील बिबीका मकबरा हे ऐतिहासिक स्थळ आहे आणि त्यामध्ये दोन मस्जीद आहेत तसेच मकब-याला चारही बाजुनी मिनार आहे परंतु ३५ ते ४० वर्षापासून मिनार वर जाण्यास बंदी आहे मकबरा बांधताना एक मस्जीद तयार करण्यांत आली होती त्यानंतर निजाम काळात दुसरी मस्जीद बांधण्यात आली मात्र औरंगाबाद च्या मार्गदर्शीकेत (गाईड बुक) मध्ये एकाच मस्जीदचा उल्लेख आहे. सध्या मकब-याची वास्तु ही मोडकळीस आलेली असुन त्याची सर्वबाजुने दुरुस्ती करण्याची उपाययोजना करणे तसेच मकब-याला आपल्या कार्यक्षेत्रात घेऊन सर्व कायदेशिर अडचणी दुर करुन मकब-यातील दोन्ही

मस्जीद मध्ये पांच वेळ नमाज पठण करण्याची परवानगी पुरातत्व विभागाकडून मिळवून देणे बाबत विनंती अर्ज दिला आहे.

यांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती बीबी का मकबरा औरंगाबाद या ऐतिहासीक स्थळा मध्ये दोन मस्जीदी मध्ये पाच वेळा नमाज पाठण करण्यासाठी पुरातत्व विभागाकडून परवानगी मिळणेसाठी पत्र व्यवहार करुन पाठपुरावा करावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ७ : मा. धर्मदाय आयुक्त, मुंबई यांनी बेकायदेशिर रित्या दिलेले इनाम जमीनीत ना हरकत प्रमाणपत्र संबंधी नियमानुसार कायदेशिर कार्यवाही करणे.

**ठराव क्र. १९/२०१६:** सभेस माहिती देण्यात आली की, वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५१ व ५२ मध्ये बेकायदेशिर रित्या वक्फ मंडळाच्या पुर्व परवानगी शिवाय करण्यांत आलेले सर्व खरेदी विक्री बाबतचे व्यवहार बेकायदेशिर व निर्रथक ठरताता, परंतु धमदाय आयुक्तांनी त्यांना कोणतेही कायदेशिर अधिकार नसतांना सन २००० ते २०११ पर्यंत एकुण (१३०) प्रकरणांत वक्फ मिळकत विक्री करण्यांची परवानगी दिलेली आहे व त्यावर विकासकांनी पुनर्विकासाचे सादर केलेले प्रस्ताव व त्यास म्हाडा, सिडको व आयुक्त, महानगरपालिका, बृहन्मुंबई यांनी बेकायदेशिर रित्या दिलेली मंजुरी हे रद्द करण्या बाबत अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्या स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्या विषयी कार्यवाही करण्या बाबतचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

तसेच मा. धर्मदाय आयुक्तांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन वक्फ मालमत्तेच्या खरेदी विक्रीस बेकायदेशिर रित्या परवानगी दिलेली असुन त्याची तपासणी करुन त्यांच्या विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करणे गरजेचे आहे व धर्मदाय आयुक्तांनी वक्फ मालमत्तेशी संबंधित प्रकरणां मध्ये दिलेले बेकायदेशिर आदेश रद्द करण्याची नियमानुसार कार्यवाही महसूल व वन विभागा मार्फत करण्यासाठी प्रस्ताव वक्फ मंडळाने उपलब्ध करुन द्यावे असे आदेश मा. मंत्री महोदय (अल्पसंख्यांक विकास विभाग) यांचे अध्यक्षतेखाली दि. ११/५/२०१६ रोजी झालेल्या बैठकी मध्ये मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, वक्फ मालमत्तांच्या बेकायदेशिर खरेदी विक्री, विकास, पुनर्विकास इत्यादींना

परवानगी देण्याच्या धर्मदाय आयुक्तांच्या कृती बद्दल विधी व न्याय विभाग मार्फत निर्देश घेणे गरजेचे आहे त्यानुषंगाने शासन स्तरावर प्रस्तुत प्रकरणांत कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास अशा प्रकरणांत वक्फ अधिनियम १९९५ (संशोधन अधिनियम २०१३) चे कलम ५२ (२) (ए) नुसार वक्फ मिळकतीचे बेकायदेशिर रित्या खरेदी विक्री करणारे संबंधित इस्मा विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहे. परंतु मुंबई धर्मदाय आयुक्त यांनी मुंबईतील (९) जागा नाममात्र दरात विक्रीची परवानगी दिल्याचे शासनास निदर्शणास आले आहे त्याची सविस्तर पणे अभिलेखाची कोणतीही माहिती वक्फ मंडळास अद्याप मिळालेली नाही त्यामुळे प्रस्तुत प्रकरणां संबंधी कार्यवाही केली गेली नाही शासनाने या बाबत धर्मदाय आयुक्त, यांनी बेकायदेशिर दिलेले आदेश (नोंदणी व अन्यसंक्रमन) (Register of Mutation) हे रद्द करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागाने करावी असे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहेत. करीता धर्मदाय आयुक्तां मार्फत बेकायदेशिर देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्राचा शोध/चौकशी करुन सक्षम न्यायालयात अवमान याचिका दाखल करणे गरजेचे आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती वरील प्रस्तावित प्रकरणांत शोध घेऊन धर्मदाय आयुक्त यांनी निर्गमित केलेले नाहरकत प्रमाणपत्रा बाबत सक्षम न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**(मा. जनाब एम.एम.शेख)**
चेअरमन

Habib Faquih

**(मा जनाब हबीब फकीह )**
सदस्य

**(मा. जनाब अब्दुल्लाह खान दुर्राणी ऊर्फ बाबाजानी )**
सदस्य

**(मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रजवी)**
सदस्य

**(मा. जनाबा ऐनुल चाँद अत्तार)**
सदस्य

Patel

**(नसीम बानु नजीर पटेल)**
सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी

## ऐनवेळचे विषय मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने

विषय क्रं. ८ पनचक्की समोर सर्वे नं. ९९ चे संरक्षण भिंत (Boundary Wall ) बांधणे बाबत ना हरकत देणे बाबत.

**ठराव क्र. २०/२०१६** सदरहू मुद्दा पुढे ढकलण्यात आले

## मा. सदस्य जनाब हबीब फकीह साहेब, यांनी मांडलेले मुद्दे

विषय क्रं. ०९ :- हाजी सुलेमान जामा नूर मस्जीद ट्रस्ट वक्फ मिळकत सि.टी.एस नं. फ- ११३३ क्षेत्र ४४४६ चौ. मि. बांद्रा , मुंबई बाबत

**ठराव क्र. २१/२०१६**: सभेस माहिती देण्यात आली की, हाजी सुलेमान जामा नूर मस्जीद ट्रस्ट वक्फ मिळकत सि.टी.एस नं. फ- ११३३ क्षेत्र ४४४६ चौ. मि. बांद्रा , मुंबइ येथील मिळकतीवर अनाधिकृतपणे सुरु असलेले बांधकामा बाबत जिल्हाधिकारी मुंबई तसेच आयुक्त महानगर पालीका मुंबई यांना सदरचे अनाधिकृत पणे सुरु असलेले बांधकाम त्वरीत बंद करणे बाबत आदेश निर्गमित करावे त्याच्या साठी कार्यवाही करण्यासाठी कंत्राटी पध्दतीनुसार वकिलाची नियुक्ती करावी. असे सर्वानुमते ठरले

विषय क्रं. १० मस्जीद व मदरसा अहले सुन्नत गुलशने मदीना , एकता नगर , शिलफाटा , मुंबरा जि. ठाणे बाबत.

**ठराव क्र. २२/२०१६**: सदरहू मिळकती बाबत सुनावणी अंती योग्य निर्णय घेउन अहवाल सादर करावा.

विषय क्रं. ११ मा. सदस्य जनाब हबीब फकीह साहेब, यांनी दि. २७/१०/२०१५ रोजी दिलेल्या पत्रानुसार पुर्वीचे मु. का. अ. याचे कार्यकाळातील पारीत केलेल्या आदेश व निर्णयाची यादी बाबत

**ठराव क्रं. २३/२०१६** यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू सदरची माहिती पुढील बैठकीत सादर करावे.

विषय क्रं. १२ दि. १३ मे २०१६ रोजी प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग मुंबई यांचे कडुन खुलासा मागविण्याचे पत्र दिले होते त्या बबात

**ठराव क्रं. २४/२०१६** यावर पुढील ७ दिवसात प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचे कडुन अहवाल घेण्याचे सुचविले

विषय क्रं. १३ मा. सदस्य वक्फ मंडळ यांच्यासाठी आलेल्या पत्र व देण्यात येणा-या पत्र व्यव्हारासाठी स्वतंत्र नेमणुक करणे बाबत

**ठराव क्रं. २५/२०१६** यावर चर्चे होउन चर्चेअंती सदरील आलेल्या पत्र व देण्यात येणा-या प व्यव्हारासाठी स्वतंत्र नेमणुक करणे बाबत ठरले.

विषय क्रं. १४ मा. फकीह साहेब यंचे अजेंडयातील मुद्दे क्रं. १ ते ४ बाबत.

**ठराव क्रं. २६/२०१६** यावर चर्चा होऊन सदरहू मुद्दे क्रं. १ ते ४ पुढील बैठकीत चर्चेला ठेवावे.

विषय क्र. १५ : विविध प्रकरणांत वकील फी अदा करणे बाबत.

**ठराव क्र. २७/२०१६**: मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ, औरंगाबाद, नागपुर, मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, न्यु दिल्ली भारत सरकार इत्यादी न्यायालयात वक्फ मंडळाकडून विविध प्रकरणांत पॅनलवरील ॲव्होकेटची नियुक्ती करण्यांत येत आहे. त्यांना प्रचलित ठरलेल्या फी प्रमाणे रक्कम अदा करणे बाबत मान्यता मिळावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ, औरंगाबाद, नागपुर, मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, न्यु दिल्ली भारत सरकार इत्यादी न्यायालयात वक्फ मंडळाकडून विविध प्रकरणांत पॅनलवरील ॲव्होकेटची फी देण्यात आले आहे त्याचा खर्चाचा तपशील पुढील बैठकीत ठेवावे.

## मा. सदस्य जनाब अब्दुल्ला खान दुर्राणी उर्फ बाबाजानी यांनी मांडलेले मुद्दे

विषय क्रं. १६ मा. सदस्य जनाब अब्दुल्लाह खान दुर्राणी ऊर्फ बाबाजानी यांनी मांडलेल्या मुद्या मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात पुर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी देणे बाबत मुद्दा उपस्थित केले

**ठराव क्रं. २८/२०१६** यावर सर्व सदस्यांनी स्वतंत्र विचार करुन ३ नावे देण्याचे निश्चित केले व मा. अध्यक्षांनी शासनास पत्रव्यव्हार करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच सर्व सदस्यांनी श्रीमती नसीम बानो नझीर पटेल मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड यांनी वक्फ बोर्डात झालेल्या **संगणक घोटाळा** तसेच जालना येथील **दर्गाह सय्यद अहमद शेर सरवार व मस्जीद मुसाफीर खाना व कब्रस्तान** च्या सर्वे नं. १०१, १०२, १०३ बाबत बेकायदेशीर हस्तांतरण बाबत वक्फ बोर्डाचे मिळकती संरक्षण केले बद्दल सर्व सदस्यांनी त्यांचे कामाचे कौतुक

केले तसेच या बद्दल अभिनंदन करुन भविष्यात अशी प्रेरणा दायक कामे करणे बाबत सर्वांनी सुचना दिले.

विषय क्रं. १७ विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी , पोलीस आयुक्त , व आयुक्त महानगर पालिका , पोलीस अधिक्षक, यांना पत्र वक्फ मिळकती बाबत बैठकीला बोलविणे बाबत.

**ठराव क्रं. २९/२०१६** या वर सर्व सदस्यांनी चर्चे केले चर्चेअंती उपरोक्त बैठकीला बोलविणे बाबत पत्र देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. १८ : दर्गाह हजरत सय्यद तुराबुल हक्क रहे, परभणी येथील गुळ फुटाने शिरणी, तसेच बोकूड कापणे व खांडखुंड चे निविदा बाबत निर्णय घेणे

**ठराव क्र. ३०/२०१६**: सभेस माहिती देण्यात आली की, दर्गाह हजरत सय्यद तुराबुल हक्क रहे, परभणी येथील गुळ फुटाने शिरणीचे दुकान असुन त्याचे निविदा पध्दतीने लिलाव करण्यांत येत आहे. या वर्षी २०१६-१७ वर्षाकरीता सदरची दुकान रक्कम रुपये १३.०० लाख मध्ये निविदा द्वारे देण्यता आलेली आहे. तसेच बोकूड कापणे व खांडखुंड करणेचा निविदा वर्ष २०१४ पासून बंद आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती दर्गाह हजरत सय्यद तुराबुल हक्क रहे परभणी येथील गुळ फुटाने शिरणी चे दुकानासाठी व बोकूड कापणे व खांडखुंड करणेसाठी निविदा प्रसिध्द करण्यांत येऊ नये सदरचा निर्णय वक्फ मंडळाच्या बैठकीत वेळेवर घेण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. १९ : भरती नियमास मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. ३१/२०१६**: मा. जनाबा ऐनुल अत्तार सदस्या, यांनी सभे समोर प्रस्तावित केले की, भरतीचे नियम तयार करुन त्याची प्रती सर्व सदस्यांना देण्यात यावी.

या बाबत सवस्तिर चर्चा होऊन चर्चेअंती महाराष्ट्र शासनाकडून भरती नियम करण्यांत आले होते परंतु ते मान्य न झाल्यामुळे शासनाकडे प्रलंबित आहे त्याची प्रत उपलब्ध करुन घ्यावी व सर्व सदस्यांना माहितीसाठी द्यावी अशी सुचना देण्यात आली. शासनाची आर आर ची प्रत मंजूर करुन बोर्ड मंजुरी साठी सर्व सदस्यांना एक एक प्रत देवुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

विषय क्र. २० : खुसरो खान, प्र.प्र.व.अ, कोकण विभाग, यांची नियुक्ती बाबत.

**ठराव क्र. ३२/२०१६**: सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा असे सर्वानुते ठरले

विषय क्र. २१ : एम.ए.माजेद खान, चौकशी अधिकारी, यांना रुजु करुन घेणे बाबत.

**ठराव क्र. ३३/२०१६**: सभेस माहिती देण्यात आली की, श्री. एम.ए.माजेद खान, चौकशी अधिकारी, यांची प्रतिनियुक्तीने बदली प्र.प्र.व.अमरावती म्हणुन करण्यांत आली होती परंतु त्यांनी दि.७/१०/२०१३ पासुन तुर्रळक रजेचे अर्ज देऊन विना परवानगीने गैरहजर होते. त्यांना सेवेवर हजर करुन घेण्यासाठी त्यांनी वेळोवेळी विनंती अर्ज दिलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती संबंधितांचा खुलासा व माफी नामा मागवुन त्यांना मुख्यालयात रुजु करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. २२ : मा. धर्मदाय आयुक्त, यांच्याकडील वक्फ मंडळाचे थकीत बाकी वसूली बाबत.

**ठराव क्र. ३४/२०१६**: दि. १/१/१९९६ पासून वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आला असून सर्व मुस्लीम न्यास वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यांत यावे म्हणुन शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना ही ब-याच मुस्लीम न्यासांच्या मुळ संचिका आज पर्यंत धर्मदाय आयुक्तांच्या विविध कार्यालया व त्या मध्ये त्यांच्याकडून २% प्रमाणे वक्फ फंड वसुली करण्यांत येत आहे. सन २००८-०९ मध्ये सारखा पाठपुरावा करुन धर्मदाय आयुक्ताकडे १९९६ नंतर मुस्लीम न्यासांची वक्फ फंडाची रक्कम वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यांत यावी म्हणुन शासनाकडे पाठपुरावा करण्यांत आला. तत्कालीन वक्फ मंत्री महोदयांनी या बाबत सकारात्मक निर्णय घेऊन धर्मदाय आयुक्तास त्यांच्याकडे जमा असलेली रक्कम रुपये ५. कोटी रक्कम वक्फ मंडळास अदा करणे बाबत निर्देश दिले व त्या प्रमाणे त्यांच्याकडून वक्फ मंडळास रक्कम रुपये १.०० कोटी प्राप्त ही झ ाले परंतु तद्नंतर उर्वरीत रक्कम त्यांच्याकडून अद्याप देण्यात आलेली नाही. अशी माहिती सभेस देण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती धर्मदाय आयुक्ताकडे किती रक्कम शिल्लक आहे त्याचा सविस्तर तपशिल व धर्मदाय आयुक्ता सोबत या पुर्वी झालेले बैठकीचा इतिवृत्त सर्व सन्मानिय सदस्यांना द्यावे व

उर्वरीत रक्कम त्यांच्याकडून वसुल करण्यासाठी पाठपुरावा करावा असे सर्वानुमते ठरले.

## मा. सदस्य जनाब मौलाना जहिर अब्बास रजवी साहेब,यांनी मांडलेले मुद्दे

विषय क्रं. २३ :- जैनबीया ट्रस्ट, मुंबई च्या संदर्भात

**ठराव क्र. ३५/२०१६**: मा. जनाब मौलाना जहिर अब्बास रजवी साहेब, यांनी सदरहू मुद्दा मांडुन यावर सविस्तर चर्चा होवुन जैनेबीया ट्रस्ट, मुंबई च्या संदर्भात चौकशी कण्यात यावी असे ठरले

विषय क्रं. २४:- नांदेड ईदगाह ची ईमामची तन्खा देणे बाबत.

**ठराव क्र. ३६/२०१६** **सदरहू प्रकरणात कायेदशीर तपासणी करुन नांदेड ईदगाह चे ईमामची तन्खा अदा करावे.**

## मा. सदस्या मौलाना गुलाम वस्तान्वी साहेब यानी शिफारस केलेले मुद्दे

विषय क्रं. २५:- हरोल मस्जीद नंदूरबार ता. जि. नंदुरबार चे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री. एन. डी. पठाण यांनी पारीत केलेले केस नं. ४२/२७०/२०११ रद्द करणे बाबत.

**ठराव क्र. ३७/२०१६** यावर सविस्तर चर्चा होउन सदरहू आदेश केस नं. ४२/२७०/२०११ रद्द करण्याचे सर्वानुमते ठरले.

## शेवटी सभेत सर्व सदस्यांनी खालील प्रमाणे सुचना दिलेले आहे.

१. २००२ नंतर चे सर्व नोंदणीचे राजपत्र प्रसिध्द करणे या पुढे दर तीन महिण्याने राजपत्र प्रकाशित होईल याची दक्षता घ्यावी.

२. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागात व जिल्ह्यात किर्द व कॅश व्यवहाराची प्रतिपुर्ती करणे आवश्यक असून दरमाह मुख्यालयात वेळेचे आंत प्रचलित नियमानुसार हिशोब सादर करणे बाबत सर्व संबंधित कर्मचा-यांना वक्फ मंडळ सभा दि.

२९/१०/२०१४ चे ठराव क्र. ५४/२०१४ मधील ठरल्या प्रमाणे सुचना करावे. सदरच्या ठरावानुसार कार्यवाही न झाल्यास संबंधितांना नोटीस दयावी.

३. केंद्र शासनाकडुन व राज्य शासनाचे पत्र व्यव्हार बाबत बोर्ड सदस्यांना निदर्शनास आणून देण्यात यावे.

४. सर्व सदस्यांचे पत्र योग्य त्या चौकशी नंतर बोर्ड मिटींग मध्ये ठेवावे

५. बायो-मॅट्रीक डेव्हाईस कार्यन्वित करण्यात यावे जे अद्याप पर्यंत कार्यान्वित झालेले नाही. पुढील बैठकीत सर्व कार्यालयात बायो मॅट्रीक बसविणे बाब मंजुरी देण्यात येत आहे.

६. बैठक इतिवृत्ताच्या च्या अंमलबजावणी साठी स्वतंत्र कर्मचा-याची नियुक्ती करावी.

७. वक्फ मंडळातील दैनंदिन उत्पन्न व खर्चाचा तपशिल मा. चेअरमन यांच्याकडे सादर करावे.

८. वक्फ मंडळ सभा दि. २९/१०/२०१४ ठराव क्र. ५४/२०१४ व ५५/२०१४ मध्ये ठरल्याप्रमाणे अंमलबाजवणी झाली नाही या बाबतचे खुलासा मागविण्यांत यावा.

९. ठराव क्रं. ५९/२०१४ दि. २६/०२/२०१४ च्या बैठकीतील ठराव क्रं. ५९ चुकीचा असल्यामुळे सर्वानुमते ठरले सबळ २००८-२००९ मध्ये जो ठराव पारीत झाला आहे त्यानुसार भाडे वसुल करावे व पोट भाडेकरु ठेवलेल्या भाडेकरुंना प्रत्येक भाडेकरु करण्यात यावे व त्यांना लिज रुल २०१३ प्रमाणे भाडे आकारण्यात यावे. कार्यालयातील ज्या कर्मचा-यांना वक्फ जमिन भाडे पट्ट्याने देण्यात आलेली आहे अश्या कर्मचा-यांना नविन भाडे करार करुन घेणे व तीच कार्यपध्दती राबविण्यात यावी.

१०. झेरॉक्स घोटाळा बाबत अहवाल सादर करावे. या अहवाला बरोबर शासनाने दिलेले चौकशी पत्र ही सर्व सदस्यांना द्यावे तसेच ३.८५ लाख हा खर्च का झाला नाही याचा खुलासा संबंधीत विभागा कडुन मागवावा.

११. सन २०१२ मध्ये शासना कडुन ३.८५,९०,०००/- प्राप्त झाले होते त्यावर सन २०१३-२०१४ मध्ये या पैकी ९९ लाख खर्च करण्यात आले व उर्वरित रक्कम

बँकेत ठेवुन त्यावर ७२ लाख व्याज जमा झाले आहे. सबब रक्कम खर्च करणे बाबत शासनाचे मार्गदर्शने घ्यावे.

१२. मुख्यालयात C.C.T.V. कॅमरे बसविणे आवश्यक असून पुर्तता करावी २ मगा (High definition Camera ) असा बसविण्यात यावे.

१३. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागात वक्फांच्या बाबत सर्व मुस्लीम न्यासांच्या विश्वस्तांना माहिती देणेसाठी शिबीराचे कार्यक्रम राबविण्यात यावे.

१४. महाराष्ट्र राज्यात वक्फ मंडळाचे कार्यालय कार्यान्वित करण्यासाठी कर्मचा-यांची भर्ती करण्यासाठी M.K.C.L. कडे मा. सदस्य जनाब हबीब फकीह साहेब यांनी संपर्क करुन पुढील रुपरेषा ठरवावी.

१५. मा. जनाब ए.टी.ए.के. शेख, (सेवानिवृत्त न्यायधिश) चौकशी आयोग, व मा. श्री. के. बी. भोगे, (भा. प्र. से) यांचे चौकशी अहवालाची प्रत सर्व मा. सदस्य, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना देण्यात यावे.

१६. महाराष्ट्र शासन अलपसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ शासन निर्णय क्र. वक्फ.२०१५/प्र.क्र.१२०/का-४ दि. १६/५/२०१६ नुसार एका कृतीदल स्थापीत करण्यासाठी पाठपुरावा करावा.

**(मा. जनाब एम.एम.शेख)**
चेअरमन

Habib Faqih

**(मा जनाब हबीब फकीह )**
सदस्य

**(मा. जनाब अब्दुल्लाह खान दुर्राणी ऊर्फ बाबाजानी )**
सदस्य

**(मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रजवी)**
सदस्य

**(मा. जनाब ऐनुल चाँद अत्तार)**
सदस्य

**(नसीम बानु नजीर पटेल)**
सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी